# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** नांदगांव खांडेश्वर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0081 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/03/2025 23:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 13/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/03/2025
**Time From (वेळेपासून):** 15:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:48 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/03/2025 **Time (वेळ):** 22:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 026
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/03/2025 23:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर ,पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर , पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर ,पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर , 444708
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शेख इरफान शेख तसलीम

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फुबगाव, तानादगाव खंडेश्वर,फुबगाव, तानादगाव खंडेश्वर,फुबगाव, तानादगाव खंडेश्वर,तानादगाव खंडेश्वर,जि अमरावती,नांदगाव खांडेश्वर, अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,444708,भारत |
| 2 | स्थायी पता | फुबगाव, तानादगाव खंडेश्वर,फुबगाव, तानादगाव खंडेश्वर,फुबगाव, तानादगाव खंडेश्वर,तानादगाव खंडेश्वर,जि अमरावती,नांदगाव खांडेश्वर, अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,444708,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9975048979

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दर्शन पं्ुडलीक दिकोंडवार | पोलीस उपनिरीक्षक | | 1. शिरे लेआउट, फ्लट क्र 47, , चैधरी हास्पीटल रोड, यवतमाळ, यवतमाळ,अवधूतवाडी, यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुकेश अनिल सारडा | | | 1. वार्ड क्र 9, हनुमान चैक,, नांदगाव खंडेश्वर अमरावती, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | नांदगाव खंडेश्वर अमरावती, नांदगाव खंडेश्वर अमरावती, नांदगांव खांडेश्वर,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत-444708 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादि पाेस्टे नांदगाव खंडेश्वर दि.18/03/2025.

माझे नांव - शेख इरफान शेख तसलीम, वय 34 वर्ष , व्यवसाय श्ेती, रा.फुबगाव, ता.नादगाव खंडेश्वर, जि. अमरावती, मोबाईल नंबर - 9975048979

मी,समक्ष् पोनि चित्रा मेसरे मॅडम यांचे समक्ष माझी फिर्यादि देतो की, मी,माझे कुटुंबासह वरील पत्त्यावर राहतो व श्ेती व्यवसाय करतो. माझे वडील नामे तसलीम शेख यांच्या नावाने ट्रॅक्टर व ट्रॉली आहे. ट्रॅक्टर चा क्रमांक एम.एच.27 बी झेड 1671 असा आहे व ट्रॉली खुप जुनी असल्यामुळे त्याला नंबर नाही. आम्ही सदर ट्रॅक्टर व ट्रॉली चा उपयोग शेती व्यवसायाकरिता करतो.

आमच्या घराचे बांधकाम मे 2024 पासुन सुरू झाले आहे. माहे जुन 2024 मध्ये आम्ही दुस-याच्या ट्रकने रेती आणुन आमच्या घरापासुन 50 मीटर अंतरावर रेतीचा ट्रक खाली केला. आमच्या घराजवळील रस्ता अरूंद असल्यामुळे ट्रक आत येवु शकत नाही, त्यामुळे आम्ही आमचेकडे असलेल्या ट्रॅक्टर आणि ट्रॉलीच्या सहायाने सदर ठिकाणावरून आमच्या घरापर्यंत रेती वाहुन आणत असतांना पोउपनि श्री.दिकोंडवार हे त्यांचे दुचाकीने तेथे आलेे व त्यांनी आमच्या ट्रॅक्टर चालक श्री.गजानन अषोक ढाले यांना अडविले व म्हटले की, तुम्ही अवैधरित्या रेतीची वाहतुक करीत आहेत, तुमच्या ट्रॅक्टरवर कारवाई करतो. ही माहिती मला ट्रॅक्टर आणि ट्रॉली चालक श्री. ढाले यांनी मोबाईलफोनद्वारे दिली, त्यामुळे मी तात्काळ सदर ठिकाणी पोहोचलो. मी, पोउपनि दिकोंडवार सरांना ट्रॅक्टर आणि ट्रॉली सोडण्याबाबत विनंती केली परंतु त्यांनी ''मला 50,000/- रूपये दया, नाहीतर तुमच्या ट्रॅक्टर व ट्रॉलीवर कारवाई करतो.'' असे म्हणुन माझा ट्रॅक्टर आणि ट्रॉली पोलीस स्टेषन नांदगाव खंडेष्वर येथे जमा केला व ट्रॅक्टर आणि ट्रॉली चालक व माझे वडील दोघांनाही आरोपी करून गुन्हा दाखल केला व त्यानंतर ट्रॅक्टर व ट्रॉली चालक याचा पी.सी.आर. न घेण्यासाठी मला जबरदस्ती पोउपनि श्री.दिकोंडवार सरांनी 35,000/- रूपयाची मागणी केली. नाईलाजाने मी त्यांना त्यावेळी 35,000/- रू. दिले. त्यानंतर जुलै 2024 मध्ये सदर ट्रॅक्टर सुर्पुदनाम्यावर सोडविण्याकरिता 'से' दाखल करण्याकरिता पोउपनि श्री.दिकोंडवार सरांनी 6,500/- रू.ची मागणी केली. नाईलाजाने मी पोउपनि श्री.दिकोंडवार यांना 6,500/- रू. दिले व कोर्टाच्या आदेषाने सदर ट्रॅक्टर मी सोडवुन घेतला.

दिनांक 11/03/2025 रोजी मी पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर येथे जावुन पोउपनि श्री.दिकोंडवार सरांना माझे ट्रॅक्टर ट्रॉली सोडविण्याबाबत विनंती केली असता, पोउपनि श्री.दिकोंडवार सर यांनी मला माझे ट्रॅक्टरची ट्रॉली सोडविण्याकरिता 15,000/- रू. ची मागणी केली व ट्रॅक्टरची ट्रॉली संबंधाने माहिती जसे सदर

ट्रॅक्टरची ट्रा◌ॅली माझे वडीलांनी कोणाकडून घेतली व केव्हा घेतली याबाबत प्रतिज्ञालेख सादर करण्याचे सांगितले व माझेकडून 10,000/- रू. नगदी घेतले व उर्वरीत 5,000/- रू. व प्रतिज्ञालेख घेवुन आल्यानंतरच साहेबांना सांगुन तुझी ट्रॅक्टरची ट्रा◌ॅली सोडतो व पैसे घेवुन श्री.दिकोंडवार सरांनी मला दि. 12/03/2025 रोजी मला बोलाविले होते. परंतु मी पोउपनि श्री.दिकोंडवार यांना आजपर्यंत घाबरुन नाईलाजाने पैसे दिले आहेत. परंतु दिकोंडवार सरांना आता ट्रॅक्टरची ट्रा◌ॅली सोडविण्याकरिता लाच म्हणुन उर्वरीत 5000/- रू. देण्याची मला मुळीच इच्छा नाही करिता पोउपनि श्री.दिकोंडवार यांचेवर कायदेशिर कारवाई व्हावी यासाठी दि. 12/03/2025रोजी लेखी तक्र◌ार दिली.

त्यावरून पोनि मेसरे मॅडम यांनी जलसंपदा विभाग, अमरावती येथुन पंच श्री. वैभव मकेष्वर, पद - कनिष्ठ लिपीक व श्री. चेतन घुरडे, पद - आरेखक असे दोन सरकारी पंच कारवाई करीता बोलविले. मला व पंचाना एकमेकांचा परिचय करून दिला. मी दिलेल्या तक्रारीवर पंच क्र. 1 श्री. मकेश्वर यांनी श्◌ेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन पोनि मेसरे मॅडम यांनी सुध्दा सही केली आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मेसरे मॅडम यांनी सांगीतले की, मला पोउपनि दिकोंडवार हे खरच लाच रक्कम मागणी करीत आहे किंवा नाही याबाबत पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर येथे जावुन पोउपनि दिकोंडवार यांची लाच मागणी संबंधाने पडताळणी कार्यवाही करणार असल्याचे सांगीतले व त्यानंतर मी पोनि मेसरे मॅडम त्यांचा स्टाफ, पंच असे सर्व नांदगाव खंडेश्वर येथे पोहचलो. त्यानंतर माझेजवळ व्हाईस रेका◌ॅर्डर चालू करुन पंच क्र.1 मकेष्वर सह पोलीस स्टेषन नांदगाव खंडेष्वर येथे पोउपनि दिकोंडवार यांना भेटण्या करीता रवाना केले. त्याठिकाणी पोहचल्यानंतर पोउनि दिकोंडवार यांची भेट घेवुन माझे ट्रॅक्टरची ट्रा◌ॅली सोडविण्याकरिता बोलनी केली तसेच त्यांना प्रतिज्ञापत्र दिले त्यावेळी श्री दिकोंडवार सरांनी यापुर्वी माझेकडुन दहा हजार रुपये स्विकारल्याचे मान्य केले परंतु कदाचीत त्यांना इतर काम असल्यामुळे उर्वरीत 5000/- रू बाबत मागणी केली नाही. तसेच त्याचवेळी पोलीस स्टेषन नांदगाव खंडेश्वर येथे जप्त असलेली आमची ट्रक्टरची ट्रा◌ॅली सोडुन दिली. त्यामुळे सर्वानुमते दि 13/03/2025 रोजी पोउपनि दिकोंडवार यांची भेट घेवुन लाच मागणी संबंधाने आणखी एकवेळा पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरवण्यात आले.

त्यानंतर दि. 13/03/2025 रोजी पोनि मेसरे मॅडम त्यांचा स्टाफ, पंच असे सर्व नांदगाव खंडेश्वर येथे पोहचले. त्यानंतर पोनि मेसरे मॅडम यांनी मला आवश्यक सुचना देवुन माझेजवळ व्हाईस रेका◌ॅर्डर चालू करुन पंच क्र.1 मकेष्वर सह पोलीस स्टेशन नांदगाव खंडेश्वर येथे पोउपनि दिकोंडवार यांना भेटण्या करीता रवाना केले. त्याठिकाणी पोहचल्यानंतर पोउपनि दिकोंडवार यांची भेट झाली. त्यावेळी दिकोडवार सरांचे केबीन मध्ये सुकेश सारडा हा खाजगी व्यक्ती देखील हजर होता. त्यावेळी दिकोंडवार सरांनी पंचासमक्ष माझेकडुन उर्वरीत 5000/- रू लाच रक्कम स्वि◌ाकारण्याचे कबुल केले. सदर 5,000/- रू लाच रक्कम तेथे हजर असलेल्या सुकेश सारडा यांचेजवळ देण्यासाठी सांगितले. त्यावेळी सुकेश सारडा मला बोलले कि, मी तुला फोन केल्यावर ये◌ेवुन जा असे बोलले. त्यामुळे मी तेथुन निघुन येवुन लागलीच पोनि मेसरे मॅडम यांचेजवळ आल्यावर मी सर्व घटना पोनि मेसरे यांना सांगितली. त्यामुळे पोनि मेसरे मॅडम यांनी लागलीच दिकोंडवार सरांवर सापळा कार्यवाही आयोजीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि मेसरे मॅडम यांनी मला सापळा कार्यवाही दरम्यान दिकोंडवार सरांना लाच देण्यासाठी 5000/- रू हजर करण्यासाठी सांगितलेमुळे मी माझे जवळील 5000/- रू मेसरे मॅडम यांचे समोर हजर केले. त्यानंतर मेसरे मॅडम यांनी सापळा पुर्व कार्यवाही पंचनामा केला त्यामध्ये मी हजर केलेल्या नोटांना अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावुन लाच रक्कम 5000/- रू (प्रत्येकी 500/- रू दराच्या 10 नोटा) माझे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली. त्याचवेळी मला दिकोंडवार सरांचा फोन आला व पोलीस स्टेशन ला येवुन भेट असे बोलेले त्यामुळे सर्वानुमते सापळा कार्यवाही पोल◌ीस स्टेशन नांदगाव खंडेश्वर येथे दिकोंडवार सर यांचेवर आजमावण्याचे ठरवण्यात आले. त्यानंतर पोशि कडु यांनी व्हाईस रेका◌ॅर्डर सुरु करुन देवून मला व पंच क्र.1 श्री. मकेष्वर यांना दिकोंडवार सरांची भेट घेण्याकरीता पोलीस स्टेशन नांदगाव खंडेष्वर येथे◌े रवाना केले ती वेळ 15◌:35 वाजताची होती. आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे खाजगी वाहनाने पोलीस स्टेशन नांदगाव खंडेश्वर येथे◌े येवुन आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री. मकेष्वर असे पोलीस स्टेशन नांदगाव खंडेष्वर येथे गेलो असता, दिकोंडवार सरांची भेट झालेनंतर आमच्यात कामासंबंधी बोलने झाले परंतु दिकोंडवार सरांना माझेवर संशय आलेमुळे त्यांनी मला बोलेले कि, तु अमरावती ला गेला होतास का? आता मला तुझावर शंका येत आहे? असे बोलले व त्यांनतर त्यांनी माझेकडुन लाच रक्कम 5000/- रू घेतले नाहीत. त्यामुळे मी व पंच क्र.1 मकेष्वर तेथुन निघुन आलो आणि आमचे पाठोपाठ पोनि मेसरे मॅडम आणि त्यांचा स्टाफ निघुन आले. पोशि कडु यांनी माझ्या जवळील व्हाईस रेका◌ॅर्डर काढुन बंद केले ती वेळ सकाळी 16◌:48 वाजताची होती. त्यानंतर दि. 17/03/2025 रोजी मी पोनि मेसरे मॅडम यांचेसमक्ष लेखी

निवेदन दिले कि, दिकोंडवार सर यांना माझेवर संशय आलेमुळे ते माझेकडुन आता लाच रक्कम स्विकारणार नाहीत. त्यामुळे त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. त्यांनतर दि. 18/03/2025 रोजी पोनि मेसरे मॅडम त्यांचा स्टाफ, पंच असे सर्व पोउपनि दर्शन दिकोंडवार यांना यवतमाळ येथुन ताब्यात घेवुन शासकीय विश्रामगृह नांदगाव खंडेश्वर येथे आले. त्यांनतर सुकेश अनिल सारडा हा स्वतःहुन शासकीय विश्रामगृह नांदगाव खंडेश्वर येथे हजर झाला. त्यानंतर मेसरे मॅडम यांनी दिकोंडवार सरांना त्यांचा, पंचांचा व स्टाफचा परीचय देवुन दिकोंडवार सरांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव दर्शन पंडलीक दिकोंडवार, वय- 35 वर्ष, पद- पोलीस उपनिरीक्षक, वर्ग - 2 रा. शिरे लेआउट, फ्लॅट क्र. 47, चैधरी हाॅस्पीटल रोड, यवतमाळ. असे सांगितले. त्यानंतर मॅडम यांनी सुकेश सारडा यांना त्यांचा, पंचांचा व स्टाफचा परीचय देवुन सुकेश सारडा यांनां त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव सुकेश अनिल सारडा, वय- 29 वर्ष, व्यवसाय- गाडी चालक, रा. वार्ड क्र. 9, हनुमान चैक, नांदगाव खंडेश्वर अमरावती. असे असल्याचे सांगितले.

तरी दि.13/03/2025 रोजी दर्शन दिकोंडवार सरांनी माझे वडील शेख तस्लीम व आमचे ट्रॅक्टर चालक गजानन ढाले यांचेवर पोस्टे नांदगाव खंडेश्वर येथे दाखल गुन्हात जप्त ट्रॉली सोडण्याकरीता पंचासमक्ष व मुकेश सारडा यांचे समोर झालेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान 5,000/- रू लाचेची मागणी केली तसेच सदर 5,000 /- रू लाच रक्कम सुकेश सारडा यांचेजवळ देण्यासाठी सांगितले. त्यावेळी सुकेश सारडा मला बोलले कि, मी तुला फोन केल्यावर येवुन जा असे बोलुन सदरचे पैसे लाच रक्कम असल्याचे माहीत असताना सुध्दा लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवली व दर्शन दिकोंडवार सरांना गुन्हा करणेस मदत केली आणि दि. 13/03/2025 रोजी 15/35 वा. ते 16/48 वा. दरम्यान आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान दिकोंडवार सरांना माझेवर संशय आले मुळे त्यांनी माझेकडुन लाच रक्कम 5000/- रू घेतले नाहीत. त्यामुळे दर्शन पंडलीक दिकोंडवार, वय- 35 वर्ष, पद- पोलीस उपनिरीक्षक आणि सुकेश अनिल सारडा, वय- 29 वर्ष त्यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटाॅपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण झालेवर ती मला वाचायला दिली, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Sunil Julalsing Solanke(I (Inspector)) / POBN58796 **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

SM IRFAN

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sunil Julalsing Solar
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN58796